सन २०१७-१८ मध्ये एकात्मिक बाल संरक्षण योजने अंतर्गत (ICPS) अर्थसंकल्पित करण्यात आलेला निधी वितरीत करण्याबाबत. (२२३५ A९१९)

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र. ICPS-२०१७/प्र.क्र.१६४/का-८,
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३१ मार्च, २०१८.

<u>वाचा</u> १) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३ दि.१८ एप्रिल,२०१७ .

२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३ दि.३० जून, २०१७.

३) आयुक्त महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे यांचे पत्र मबाविआ/बावि/तरतूद/२०१७-१८/४१३३ दि. २० जुलै,२०१७.

४) समक्रमांक शासन निर्णय दि. २७.९.२०१७ व दि. ३०.३.२०१८.

५) शासन निर्णय- ICPS-२०१८/प्र.क्र. १८०/का-८,दि. ६ मार्च, २०१८.

७) महिला व बालविकास विभाग मंत्रालय, नवी दिल्ली यांचे आदेश क्र.१४-३/२०१३-CW-II दि.५.७.२०१७.

८) महिला व बालविकास विभाग मंत्रालय, नवी दिल्ली यांचे आदेश क्र. CW-II-२२/८३/२०१५-CW-II दि.२७.०३.२०१८.

<u>प्रस्तावना :</u>

१. एकात्मिक बाल संरक्षण योजना (ICPS) या केंद्र पुरस्कृत योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटीची (MSCPS), नोंदणी अधिनियम १८६० खाली, नोंदणी करण्यात आली आहे. योजनेच्या अमंलबजावणीसाठी केंद्रशासनाशी करण्यात आलेल्या सामंजस्य करारानुसार, या योजनेसाठीचा केंद्र व राज्य हिश्श्यांचा निधी महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटीच्या बँक खात्यात जमा करण्यात येऊन खर्च करण्यात येतो.

२. सन २०१७-१८ करिता एकात्मिक बाल संरक्षण योजनेसाठी लेखाशिर्ष (२२३५ A९१९), सुधारित अंदाज २०१७-१८ मध्ये ३१, सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) यासाठी रू. ३८४४.६८ लक्ष व ३६ ,सहाय्यक अनुदान (वेतन) यासाठी रू. २३९२.९३ लक्ष असे एकूण रु. ६२३७.६१ लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे.

४. संदर्भ क्र. ५ च्या शासन निर्णय दि. ६.३.२०१८ अन्वये एकात्मिक बाल संरक्षण योजनेअंतर्गत सन २०१५-१६ पासून बदललेल्या केंद्र:राज्य ६०:४० व स्वयंसेवी संस्थांच्या बाबतीत ६०:३०:१० याप्रमाणास मान्यता आणि सन २०१४-१५ पासून केंद्रशासनाने सुधारित केलेले निकष लागू करणे यास मान्यता प्राप्त झालेली आहे.

५. संदर्भ क्र. ८ अन्वये केंद्रिय महिला व बाल विकास मंत्रालय, मुंबई यांचे दि. २७.३.२०१७ च्या आदेशान्वये केंद्र हिस्सा अंतर्गत रू. २२४.१६ लक्ष वितरित करण्यात आला आहे. केंद्रशासनाचे दि. २७.०३.२०१८ रोजीचे आदेश विचार घेता, केंद्र व राज्य हिश्श्यासाठीचा एकूण रू. ३७३.६० लक्ष इतका

निधी महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटी, पुणे यांचकडे आयुक्त,महिला व बाल विकास आयुक्तालयामार्फत वितरित करण्यासाठी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

१. आता सन २०१७-१८ साठी एकात्मिक बाल संरक्षण योजनेखाली असलेल्या सर्व यंत्रणा तसेच शासकीय व स्वयंसेवी संस्था यांचेकरीता मागणी क्र.एक्स-०१ लेखाशिर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ,१९९,अशासकीय संघटनांना सहाय्य, (००) (०१) एकात्मिक बाल संरक्षण योजना (२२३५ A९१९), ३६ सहायक अनुदाने (वेतन) अंतर्गत रू. ३७३.६० लक्ष इतकी तरतूद, महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटी, पुणे यांना आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालयामार्फत वितरित करण्यास व ती खर्च करण्यास या शासन निर्णयाअन्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधीचे, नियंत्रण करण्यासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त रक्कम एकात्मिक बाल संरक्षण योजनेंतर्गत समाविष्ट बाबींसाठी खर्च होईल याची दक्षता आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी घ्यावी. एकात्मिक बाल संरक्षण योजनेंतर्गत होणाऱ्या उपरोक्त तरतूदीबाबत खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्थेने आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचेमार्फत केंद्र शासन व राज्य शासनाला सादर करावेत.

४. शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतूदींपेक्षा अधिकचा खर्च होणार नाही याची काळजी नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी. या रकमा खर्च करताना राज्य शासनाची कार्यनियमावली, वित्तीय नियमावली व या विभागाच्या तसेच वित्त विभागाच्या वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे तसेच वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रकातील सर्व अटी /शर्तींचे पालन करण्यात यावे.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०३३१२३११३९४३३० असा आहे. सदरचा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2018.03.31 23:12:43 +05'30'

(स्मिता निवतकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल, यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई .
३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा ,महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
४) मा.सभापती/उपसभापती विधानपरिषद ,महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
५) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा /विधानपरिषद,महाराष्ट्र विधीमंडळ.

६) मा.मंत्री (म व बा वि)/ राज्यमंत्री(म व बा वि),यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई .

७) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव,मंत्रालय,मुंबई

८) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

९) अपर मुख्य सचिव, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.

१०) प्रधान सचिव (व्यय),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई

११) प्रधान सचिव (ले व को),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई

१२) आयुक्त , महिला व बाल विकास आयुक्तालय,म.रा. पुणे.

१३) उप आयुक्त (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१४) कार्यक्रम व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटी, पुणे.

१५) महालेखापाल १, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),मुंबई

१६) महालेखापाल २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),नागपूर

१७) संचालक,लेखा व कोषागरे संचालनालय,म.रा.मुंबई

१८) संचालक,स्थानिक निधी लेखा परीक्षा,कोकण भवन,नवी मुंबई

१९) सर्व उपसचिव ,सर्व अवर सचिव, महिला व बाल विकास. नवीन प्रशासकीय भवन , मुंबई

२०) उपायुक्त (बालविकास) महिला व बाल विकास आयुक्तालय, म.रा.पुणे.

२१) वित्त विभाग (व्यय-६/अर्थसंकल्प-७/कोषा-प्रशा-२), नियोजन विभाग (का-१४७२) मंत्रालय,मुंबई -३२,

२२) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.

२३) सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन , मुंबई

२४) निवड नस्ती का-८.